# महाराष्ट्र टाइम्स

नागपूर टाइम्स सह

www.maharashtratimes.com

नागपूर, मंगळवार, १ जानेवारी २०१३

◆ पाने १४ + ६ ◆ शहर आवृत्ती ◆ रुपये ३.००


# सृजनचा आज 'अलंग अंदाज'



■ गौरी जोग

म.टा.प्रतिनिधी ■ नागपूर

कथ्थक केंद्राने भारतीय पारंपरिक शास्त्रीय नृत्यकला आणि संगीताला जिवंत ठेवण्याचे कसोशीने प्रयत्न केले आहे. त्यासाठी वर्षभर अनेक उपक्रमांची आयोजन करण्यात आलेले असून नवीन वर्षाचे स्वागतही अनोख्या पद्धतीने करण्याचा केंद्राचा मानस आहे.

मंगळवार, १ जानेवारी २०१३ रोजी गौरी जोग व गौरी पारधी या कथ्थक नृत्यांगणांच्या नृत्याचा कार्यक्रम शंकरनगर येथील साई सभागृहात घेण्यात येत आहे. सायंकाळी ७ वाजता कार्यक्रमाला प्रारंभ होईल. शिकागो येथे कथ्थक नृत्याचे प्रशिक्षण देणाऱ्या गौरी जोग याप्रसंगी दुर्गास्तुती, ताल धमार, ठुमरी आणि फ्यूजन सादर करणार आहे. पं. पूनम महाराज व्यास यांच्या शिष्या गौरी पारधी शिवस्तुती, ताल त्रिताल सादर करणार आहेत. पं. रितेश व्यास यांच्या 'मीरा' या सुफियाना काव्यावर त्या नृत्य सादर करणार आहे.



■ गौरी पारधी